# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः30.07.2024** **वारःमंगळवार**

---

**ठळक बातम्या**

दिल्लीतील युपीएससीच्या तीन परीक्षार्थी च्या मृत्यू प्रकरणाच्या चौकशीसाठी केंद्रीय गृह मंत्रालयाकडून समिती स्थापन

विकसित भारताच्या दिशेने प्रवास या विषयावरच्या परिषदेच्या उद्घाटन सत्राला पंतप्रधान आज संबोधित करणार

भारत श्रीलंका यांच्यात 20 षटकांचा तिसरा क्रिकेट सामना आज

आणि

केरळमध्ये पावसाचं थैमान, वायनाड जिल्ह्यात भू स्खलनात 19 जणांचा मृत्यू

**UPSC विद्यार्थी**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची तयारी करत असलेल्या दिल्लीच्या राजेंद्र नगर भागातल्या तीन तरुण विद्यार्थ्यांचा एका कोचिंग वर्गात बुडून मृत्यू झाला. या घटनेची चौकशी करण्यासाठी केंद्रीय गृह मंत्रालयानं समिती स्थापन केली आहे. ही दुर्घटना घडण्या मागची कारणं, त्याला नेमकं कोण जबाबदार आहे, अशा गोष्टींची चौकशी ही समिती करणार असून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी करायचे उपाय आणि त्या अनुषंगानं धोरणातील बदलही समिती मार्फत सुचवण्यात येतील. तत्पूर्वी विद्यार्थ्यांच्या मृत्यूचा हा मुद्दा काल संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये उपस्थित करण्यात आला. लोकसभेत भाजपा आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांच्या सदस्यांनी या प्रकरणाच्या चौकशीची मागणी केली. लोकसभेतील शून्य प्रहरात भाजपच्या बासुरी स्वराज यांनी या प्रकरणाच्या तपासासाठी केंद्रीय गृहमंत्रालयानं चौकशी समिती स्थापन करावी अशी मागणी केली. तर, काँग्रेसच्या शशी थरूर यांनी या घटनेची सखोल चौकशी करण्याची मागणी केली. हे कोचिंग वर्ग चालवण्यास ना हरकत प्रमाणपत्रं देणारे अधिकारी याला जबाबदार असल्याचा आरोप समाजवादी पक्षाच्या अखिलेश यादव यांनी केला. राज्यसभेत भाजपच्या डॉक्टर सुधांशु त्रिवेदी यांनी या मुद्द्यावर चर्चेला सुरुवात करत ही घटना म्हणजे गुन्हेगारी स्वरुपाचा निष्काळजीपणा असल्याचं म्हणत शहर प्रशासनानं सांडपाणी व्यवस्थेच्या स्वच्छतेसाठी किती खर्च केला असा सवालही केला. तृणमूल काँग्रेसच्या डेरेक ओब्रायन यांनी घटनेबद्दल चिंता व्यक्त केली. शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी चर्चेत हस्तक्षेप करत या प्रकरणात

निष्काळजीपणा झाला असून त्याला जबाबदार अस लेल्यांना दोषी धरण्याची गरज व्यक्त केली. दिल्ली सरकारनं विद्यार्थ्यांच्या मृत्यूबद्दल प्रत्येकी एक कोटी रुपयांची भरपाई द्यावी असं आम आदमी पक्षाच्या स्वाती मालीवाल म्हणाल्या. दरम्यान , काल दिल्लीत आम आदमी पक्षाच्या मुख्यालयासमोर , दिल्ली भाजप पक्षाच्या वतीनं  या दुर्घटनेच्या निषेधार्थ  निदर्शनं  करण्यात आली. या प्रकरणी सात जणांना अटक करण्यात आल्याचं  दिल्ली पोलिसांनी सांगितलं.

**संसद**

केंद्र सरकारच्या विविध धोरणांमुळे देशातला बेरोजगारीचा दर 3 पूर्णांक 2 दशांश टक्क्यांपर्यंत खाली आला असून येत्या काही वर्षात हा दर तीन टक्क्यांच्या खाली येईल असा विश्वास श्रम आणि रोजगार मंत्री मनसुख मांडवीय यांनी व्यक्त केला आहे. ते काल लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात बोलत होते. येत्या पाच वर्षांत 4 कोटीपेक्षा जास्त युवकांना रोजगार आणि कौशल्य विकासाच्या संधी मिळतील, असं ते म्हणाले. लोकसभेत कालही अर्थसंकल्पावरील चर्चा सुरू होती; यावेळी विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी जात निहाय जनगणनेची मागणी केली. यंदाचा अर्थसंकल्प हा केवळ श्रीमंतांसाठी होता; यात गरीब आणि शेतकऱ्यांसाठी काहीच नव्हतं अशी टीका राहुल गांधी यांनी केली.

**पीएम-पोस्ट बजेट**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत विकसित भारताच्या दिशेने प्रवास या विषयावरच्या 2024-25 च्या अर्थसंकल्प पश्चात परिषदेच्या उद्घाटन सत्राला संबोधित करणार आहेत. भारतीय उद्योग संघानं अर्थात सीआयआयनं या परिषदेचं आयोजन केलं आहे. विकसित भारताच्या दिशेनं वाटचाल करताना त्यातील सरकारची आर्थिक विकासाची दृष्टी आणि उद्योगांची भूमिका याबद्दलची रुपरेषा सादर करण्याच्या उद्देशानं या परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. उद्योग क्षेत्रातील तसंच सरकारमधील प्रतिनिधी, मुत्सद्दी वर्ग तसंच देशातील सीआयआयच्या विविध केंद्रांमधील मान्यवर या परिषदेत सहभागी होणार  आहेत.

**क्वाड-दहशतवाद**

दहशतवाद्यांकडून सध्या नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला जात असल्याचा इशारा क्वाड गटातील चार देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांनी दिला आहे. त्याविरोधात संयुक्त राष्ट्रसंघाच्या यादीतील दहशतवादी संघटनांवर आंतरराष्ट्रीय स्तरावर कारवाई केली जावी अशी मागणीही त्यांनी केली आहे. लष्कर- ए-तैयबा, जैश-ए महंमद तसंच अल कायदा आणि इस्लामिक स्टेट या संघटनांचा त्यामध्ये समावेश आहे. दहशतवाद पसरवण्याच्या हेतूनं करण्यात येणाऱ्या नवीन आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे निर्माण होणारे धोके रोखण्यासाठी आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक भागीदारांसोबत काम करण्यास

वचनबद्ध आहे, असं क्वाडच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या टोकियो इथं झालेल्या बैठकीनंतर काल जारी केलेल्या संयुक्त निवेदनात म्हटलं आहे.

**हैतीमदत**

भारतानं हैतीला वैद्यकीय उपचार सामग्रीसह मानवतावादी मदत पाठवली आहे. काल या मदतीची खेप नवी दिल्लीतून पोर्ट ओ प्रिन्सकडे रवाना करण्यात आली.

**अमरनाथ यात्रा**

अमरनाथ यात्रेसाठी 1 हजार 477 यात्रेकरूंची आणखी एक तुकडी आज पहाटे जम्मू-काश्मीरमधल्या भगवतीनगर यात्री निवासातून रवाना झाली. आज पहाटे साडेतीन वाजता रवाना झालेल्या या तुकडीत 1142 पुरुष, 254 महिला, तीन मुलं, 66 साधू आणि 12 साध्वींचा समावेश आहे.

**इंग्लिश खाडी**

मुंबईची जिया राय, इंग्लिश खाडी सर्वात कमी वेळात पार करणारी जगातली सर्वात कमी वयाची दिव्यांग जलतरणपटू ठरली आहे. 16 वर्षांच्या जियानं 34किलोमीटरचं हे अंतर 17 तास, 25 मिनिटांमध्ये पार केलं.

**ऑलिंपिक**

पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेत काल  नेमबाजीमध्ये 10 मीटर एअर पिस्टल मिश्र प्रकारात भारताच्या मानू भाकर आणि सरबज्योत सिंह यांची जोडी कांस्य पदकासाठीच्या सामन्यासाठी पात्र ठरली आहे. आज भारतीय प्रमाण वेळेनुसार दुपारी 1 वाजता  त्यांचा सामना दक्षिण कोरियाच्या जोडीशी होणार  आहे. हॉकीमध्ये काल भारत अर्जेंटीना  सामना बरोबरीत सुटला. आज भारतीय हॉकी संघाचा सामना आयर्लंड शी होणार आहे. बॅडमिंटन मध्ये लक्ष्य सेननं पुरुष एकेरीत बेल्जियमच्या  जूलियन कैरागी याला हरवून आपला पहिला विजय नोंदवला. बॅडमिंटन पुरुष दुहेरी मध्ये भारताच्या सात्विक साईराज रंकी रेड्डी आणि चिराग शेट्टी  या जोडीने उपांत्य पूर्व फेरीत प्रवेश केला आहे.

**टी-20 सामना**

भारत आणि श्रीलंकेच्या क्रिकेट संघांदरम्यान सुरू असलेल्या टी-ट्वेंटी मालिकेतला तिसरा आणि अंतिम सामना आज संध्याकाळी श्रीलंकेतल्या पल्लेकेले मैदानावर खेळला जाणार आहे. भारतीय संघानं आधीचे दोन सामने जिंकून आघाडी घेतली असल्यानं भारतानं या मालिकेचं विजेतेपद याआधीच निश्चित केलं आहे. आजचा सामना जिंकून या मालिकेत निर्भेळ यश मिळवण्याचा भारताचा प्रयत्न असणार आहे.

**हवामान**

येत्या 3 - 4 दिवसात भारताच्या वायव्येकडील विविध राज्यांमध्ये मान्सून पुन्हा सक्रिय होण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे . हिमाचल प्रदेश , उत्तराखंड , जम्मू काश्मीर , लडाख , पंजाब, हरियाणा, छत्तीसगड , दिल्ली, उत्तरप्रदेश आणि पश्चिम राजस्थानांत सर्वदूर पाऊस पडण्याची शक्यता असून , तुरळक ठिकाणी अतिमुसळधार पाऊस अपेक्षित आहे . तसच येत्या 2 ऑगस्टपर्यंत कोकण , गोवा , मध्यप्रदेश , दक्षिण कर्नाटकातील दुर्गम भाग आणि किनारी प्रदेश आदि राज्यात तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**केरळ पाऊस**

केरळमध्ये मुसळधार पावसाने थैमान घातलं असून, मुख्यतः मध्य आणि उत्तर केरळमध्ये अतिवृष्टी सुरू आहे. वायनाड जिल्ह्यात मेप्पडी इथं आज सकाळी झालेल्या भू स्खलनाच्या दुर्घटनेत अनेक जण ढिगाऱ्याखाली दबले गेल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. या दुर्घटनेत 19 जणांचा मृत्यू झाल्याचं वृत्त आहे. पंतप्रधानानंनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या वारसांना प्रत्येकी 2 लाख रुपयांच्या तर जखमींना 50 हजार रुपयांच्या मदतीची घोषणा केली आहे.
इडूक्की पल्लककड जिल्ह्यातही अनेक ठिकाणी भूस्खलनाच्या घटना घडल्या आहेत.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**